महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.२०६/२०२३/जाहिरात दिनांक: १९ जानेवारी, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, गट-ब शासकीय दंत महाविद्यालये**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-४१०/२०२३ ते ४१३/२०२३**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत **शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, गट-ब** या संवर्गातील पद भरतीकरीता शासनाने पाठविलेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी (जा.क्र. ४१०/२०२३ ते ४१३/२०२३) प्रसिध्द करण्यात आली आहेत. त्यामधील खालील विवरणपत्रात नमूद संवर्गनिहाय विषयांकरीता शासन मागणीपत्रानुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता पद आरक्षित असून अराखीवकरीता पदे कळविण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय |
|---|---|---|
| १ | ४१०/२०२३ | दंतपरिवेष्टनशास्त्र |

२. तथापि, शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व ओषधी द्रव्ये विभाग, क्रमांक मलोआ २०२४/प्र.क्र.०९/२४/वैसेवा-२, दिनांक १८ जानेवारी, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३१ मे, २०१९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरीता (EWS) आरक्षणांतर्गत सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार पदे भरणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यानुषंगाने उपरोक्त विवरणपत्रात नमूद संवर्गनिहाय व विषयनिहाय जाहिरातींकरीता खुल्या प्रवगातील अर्हताप्राप्त उमेदवारांना (मागासवर्गीय उमेदवारांसह) अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून संवर्गनिहाय व विषयनिहाय जाहिरातींना अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक** | **दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

३. उपरोक्त नमूद जाहिरातीस अनुसरुन विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
४. वयोमर्यादा गणण्याचा दिनांक तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल मयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.
६. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.
७. सदर शुध्दीपत्रक तसेच उपरोक्त नमूद मूळ जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.